# शिक्षणाचा हक्क आणि गांधी

**– राहुल बैस**

भारतात सर्वसामान्य जनतेला किंवा सर्व बालकांना शिक्षणाचा हक्क समाजाला मान्य होता काय? इतिहासकारांमध्ये याबाबतीत एकमत असल्याचे आपल्या वाचनात येत नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज अधिकारी मोठी फुशारकी मारायचे की भारतीयांकरीता शिक्षणाची सोय इंग्रजांनीच मिळवून दिली. यावर महात्मा गांधींनी एकदा 'हरिजन' मधून लिहले की इंग्रज येण्यापूर्वी भारतात जास्त चांगली शिक्षण व्यवस्था होती. अवर्ण म्हंटल्या जाणाऱ्या जातीतल्या बालकांकरीताही शिक्षणाची सोय होती असा गांधीजींचा दावा होता. 1930 मध्ये लंडन येथील गोलमेज परिषदेसाठी गेलेले असतांना तेथे एका भाषणात गांधीजी म्हणाले ''भारत पन्नास किंवा शंभर वर्षांपूर्वी होता त्यापेक्षा आज जास्त अशिक्षित आहे असे मी निःसंकोच सांगू शकतो. माझ्या या विधानाचा कोणालाही यशस्वी प्रतिवाद करता येणार नाही, अशी माझी खात्री आहे.'' साहजिकपणे या भाषणानंतर उठलेल्या वादंगानंतरही गांधीजी आपल्या विधानांवर कायम राहीले.

प्रख्यात इतिहासतज्ज्ञ श्री धर्मपाल यांनी गांधीजींच्या दाव्यासंदर्भात संशोधन करून त्यातील तथ्य मांडले. त्याप्रमाणे भारतात उपजीविका आधारीत शिक्षण देण्याची जाती–जातीगत किंवा कौटुंबिक व्यवस्था अस्तित्वात होती. त्यामुळे भंगीकामाचे शिक्षण त्या व्यवसायातील कुटुंबियांच्या बालकांना सहज मिळत असे.

परंतु राज्यकारभार किंवा खरेदी–विक्रीचा व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक भाषा आणि गणिताचे शिक्षणही त्यांना मिळत होते काय? याचे उत्तर 'नाही' असेच आहे. असे शिक्षण विशिष्ट जातीतल्या बालकांनांच उपलब्ध होते. यातील लिंगभेदही विसरायला नको. त्याकाळी सर्व जातीतल्या स्त्रियांकरीता असे शिक्षण निषिद्ध होते.

परकीय आणि जाती–अंतर्गत गुलामगिरीची मुळ आपल्या शिक्षण व्यवस्थेत असल्याची जाणीव स्वातंत्र्य आंदोलनात मोठ्या प्रमाणात झाली. उपजीविकाव्यतिरिक्त राज्यकारभार संबंधी समान शिक्षण घेण्यासाठी सर्वच जातीतल्या लोकांमध्ये मानसिकता तयार होऊ लागली. अवर्ण म्हंटल्या जाणाऱ्या जातीतल्या लोकांनी असे शिक्षण घेतल्यास ते सेवाकार्याला नकार द्यायला लागतील, अशा भितीतून त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण करण्याची चळवळही सवर्ण म्हंटल्या जाणाऱ्या जातींनी सुरू केली.

स्वतःच्या राज्यकारभारापुरते मानवी संसाधन मिळविण्याकरीता शिक्षणाची सोय उपलब्ध करणे इंग्रज सरकारचे मर्यादित ध्येय असल्याने त्यांचाकडून वंचित समाज घटकांच्या शिक्षणाकरीता विशेष सवलत व हक्क मान्य होणे अपेक्षित नव्हतेच.

वंचित समाज घटकांतील कित्येकांची शिक्षण घेण्याची जिद्द आणि त्यांना मदतीसाठी हिरिरीने पुढाकार घेतलेल्या सामाजिक–राजकीय कार्यकर्त्यांपुढे जातीगत श्रेष्ठत्वाचा अहंकार फीका पडू लागला. वंचित समाज घटकांतून मर्यादित संख्येतील शिक्षित पिढी तयार होऊ लागली. परंतु शिक्षित होणे हे व्यक्तीगत जिद्द आणि मिळालेल्या संधी–सोयी–सवलती यांवर अवलंबून राहिले. हक्क म्हणून जनसामान्यांची व शासनाची मान्यता मिळवू शकले नाही. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व भारतात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले नाही.

शिक्षणाच्या बाबतीत सामाजिक घुसळण सुरू असलेल्या त्या काळी सर्वांना शिक्षण मिळावे अशी सदिच्छा बाळगणारे मुख्यतः तीन प्रकारचे लोक होते.

पहिला प्रकार – अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत शिक्षण घेणारे वंचित समाज घटकांतील सावित्रीबाई फुले सारख्या स्त्री विद्यार्थीनी, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारखे पुरूष विद्यार्थी;

दुसरा प्रकार – वंचित समाज घटकांना शिक्षण मिळावे या हेतुने प्रतिकूल परिस्थितीतही शाळा उघडण्याचे किंवा शिक्षण संस्था सुरू करणारे सामाजिक–राजकीय कार्यकर्ते जसे – महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, इत्यादि.;

आणि तिसरा प्रकार – जमीन, पैसा, वस्तू स्वरूपात देणगी देऊन वंचित समाज घटकांसाठी शिक्षणाची संधी मिळवून देणारे दाते जसे – राजश्री शाहु महाराज, श्रीमान शंकरशेठ, रायबहादूर डी. लक्ष्मीनारायण, इत्यादि.

सुरूवातीच्या काळात जातीव्यवस्थांतर्गत पारंपरिक शिक्षणाला गौरवणारे, परंतु काळाच्या ओघात सर्वांसाठी बुनियादी शिक्षण योजनेच्या माध्यमातून समाज–परिवर्तनाचे बीज रोवणारे गांधीजी या तिन्ही प्रकारच्या व्यक्तींपेक्षा काहीसे वेगळे राहीले.

1935 साली अस्तित्वात आलेल्या 'इंडिया ॲक्ट' अन्वये प्रांतीय सरकारमध्ये स्थानिकांना वाव मिळणे शक्य झाले. परिणामी 12 जुलै 1937 रोजी देशभरातील आठ प्रांतांमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सत्तारूढ झाली. आपले सरकार आहे म्हंटल्यावर जनसामान्यांच्या अपेक्षा उंचावणे स्वाभाविक होते. दारूबंदी हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिकृत धोरणाचा भाग होता; आणि साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असलेल्या या देशातील सर्व बालकांसाठी प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची सोय करणे सरकारची प्राथमिकता ठरले.

त्याकाळी एकुण सरकारी महसुलापैकी एक तृतीयांश महसूल दारूवरील अबकारी कराद्वारे सरकारी तिजोरीत जमा होत असे. म्हणजे दारूबंदी केली तर महसूलाचा मोठा हिस्सा बुडेल आणि शिक्षणाची सोय करता येणार नाही हे स्पष्ट होते. आपले सरकार असूनही एक महत्वाचे धोरण व प्राथमिकता अंमलात आणण्यात अपयशी ठरत होते.

अबकारी कर महसूल बुडाला तरी कोणत्याही परिस्थितीत दारूबंदी अंमलात आलीच पाहिजे यावर गांधीजी ठाम होते. त्याचवेळी 'शासन आश्रयी' शिक्षणव्यवस्था बदलवून 'उद्योगाकरवी शिक्षण' असलेली आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर अशी शिक्षणव्यवस्था उभारणीचे प्रारूप गांधीजींनी दि. 31 जुलै 1937 रोजी 'हरिजन' मधून मांडले. दि. 22 आणि 23 ऑक्टोबर 1937 रोजी वर्धा येथील 'अखिल भारतीय शिक्षण परिषद'च्या उद्‌घाटनपर भाषणात गांधीजींनी आपल्या प्रस्तावित शिक्षण योजनेचे, म्हणजेच 'नई तालीम' किंवा 'बुनियादी' शिक्षणाचे तपशीलवार विस्ताराने विवेचन केले. या योजनेतील प्रमुख सूत्र होती – 1) उद्योगाच्या माध्यमातून सर्व विषयांचे शिक्षण दिले जावे. 2) विद्यार्थ्यांच्या उत्पादनातून शिक्षकांचा खर्च निघावा. भारतातील गरीबी, निरक्षरता, परकीय आणि जाती–अंतर्गत गुलामगिरीची मानसिकता, आदि अनेक समस्यांवर प्रतिभाशाली व मौलिक उपाययोजना करीत समाज–परिवर्तनाची बीजे असणाऱ्या या 'नई तालीम' बद्दल गांधीजींना एकदा म्हंटले होते – ''नई तालीम ही देशाला माझी शेवटची आणि सर्वोत्तम देणगी आहे.''

एप्रिल 1938 मध्ये वर्ध्यात नई तालीमची पहिली संस्था सुरू झाली. पुढे अनेक ठिकाणी नई तालीमची विद्यालये सुरू होणे व जुन्या शाळांना नई तालीम अनुसार पुनर्गठीत करण्याचे काम सुरू झाले. केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने मार्च 1939 मध्ये 'राष्ट्रीय शिक्षणनीती' म्हणून नई तालीमला मान्यता दिली. देशभर नई तालीमला अनुकूल वातावरण निर्माण होऊ लागले आणि त्यातच बदलत्या जागतिक परिस्थितीचा धक्का नई तालीमला बसू लागला. द्वितीय जागतिक महायुद्ध सुरू झाल्यामुळे एकुणच शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ लागले. काँग्रेस सरकारांनी राजीनामे दिलेत. परिणामी अनेक प्रांतातले नई तालीम कार्यक्रम बंद पडले.

अशा परिस्थितीत दिल्ली येथे एप्रिल 1941 मध्ये आयोजित नई तालीमच्या दुसऱ्या संमेलनाला पाठवलेल्या आपल्या संदेशात गांधीजींनी लिहले – ''बुनियादी शिक्षणाची सफलता सरकारवर अवलंबून ठेवण्याऐवजी स्वावलंबानेच साधू शकते, आणि मदत करतांना सरकारची नीयत कितीही चांगली असली तरी त्याबाबत आपण सावध राहिले पाहिजे, हे या संमेलनाच्या लक्षात येईल, अशी मला आशा वाटते.''

संमेलनाच्या मुख्य ठरावात म्हंटले होते – ''सरकारी, गैरसरकारी, खाजगी – सर्वच संस्थांच्या बुनियादी शाळांच्या अहवालांवरून दिसते की या शिक्षणाने मुलांचे आरोग्य, वर्तन आणि मानसिक विकास यांच्यावर फार चांगला परिणाम केला आहे. बुनियादी शाळांचे विद्यार्थी जास्त उत्साही, आनंदी व आत्मविश्वास–संपन्न आहेत. आपले म्हणणे ते चांगल्या प्रकारे मांडू शकतात. त्यांच्यात मिळून–मिसळून काम करण्याची सवय रूजत आहे. ते सामाजिक बंधनातून मुक्त होत आहेत. प्रत्येकच नव्या कामात अडचणी असतात. त्या पाहता या परिणामांबद्दल आम्हाला समाधान वाटते, आणि भविष्यात याहून चांगले परिणाम मिळतील अशी आशा वाटते.''

1942च्या 'चले जाव' आवाहनानंतर तापलेल्या स्वातंत्र्य चळवळीत नई तालीमची प्रमुख मंडळीही तुरूंगात गेली. 1945–46 मध्ये कार्यकर्ते तुरूंगातून सुटू लागलेत आणि अनेक प्रातांत काँग्रेस सरकार सत्तेत आल्यावर नई तालीमने पुन्हा जोर धरला.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. मात्र ब्रिटिशकालीन शिक्षणाचा जबरदस्त पगडा असलेले सरकार आणि तसे पुढारी यांच्यामुळे सुरूवातीला नई तालीमला शाब्दिक मान्यता मिळत राहिली परंतु प्रत्यक्षात तिच्या यशासाठी भरीव योगदान देण्यात आले नाही. पुढे 'राष्ट्रीय शिक्षण आयोग' आणि शिक्षण मंत्रालयाच्या बदलत्या धोरणांमध्ये भारतात तर तिचे नामोनिशाणही उरले नाही.

प्रख्यात सामाजिक शास्त्रज्ञ डॉ. अभय बंग यांच्या नई तालीम विद्यालयातील विद्यार्थीदशेच्या आठवणी 'शिक्षणाचे जादूभरे बेट' ('साम्ययोग' विशषांक 1987 मध्ये प्रकाशित) या लेखातून वाचायला मिळतात. नई तालीमची व्यवहारिक फलनिष्पत्ती त्यातून आपल्याला समजते. या प्रकारच्या शाळा आज अस्तित्वात नसल्यात तरी गांधीजींचा सर्व बालकांकरीता शिक्षण हक्क प्रस्थापित करण्याचा मार्ग बोध यातून होतो.

गांधीजींच्या शिक्षण हक्क विचाराचा सार खालीलप्रमाणे मांडता येईल.

- वंचित घटकातील बालकांचा प्राधान्याने समावेश असलेले सर्व बालकांना शिक्षण हक्क.
- बालकांच्या शिक्षण हक्क पूर्ततेसाठी सरकार समावेशित समाजाचा पुढाकार व कर्तव्य.
- उपजीविका आधारीत शिक्षण – बालकांनी उपजीविका आणि दैनंदिन जीवनक्रमातील काम करता–करता शिकावे अशी शिक्षण पद्धती.
- शिकविणारा आणि शिकणारे अश्या परंपरागत भूमिकेच्या पलीकडे जाऊन शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही एकाच शिक्षण प्रक्रियेचे सहप्रवासी बनतात.
- शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कामातून तयार झालेल्या उत्पादनाची विक्री अथवा उपयोगातून शिक्षक, शाळा आणि शिक्षण व्यवस्थेसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो.
- शाळा व शिक्षण व्यवस्थेच्या खर्चासाठी दारू सारख्या समाज विघातक बाबींच्या अबकारी करावर अवलंबन अजिबात नको.
- माणुसकीची मूल्ये प्रस्थापित होणे आणि उपजीविका सक्षम जबाबदार नागरिकांची घडण होणे हे शिक्षणाचे उद्देश.

राष्ट्राच्या विस्मरणात गेलेल्या शिक्षण हक्क विचाराचे आज गांधी जयंती निमित्त्याने हे मंगल स्मरण!

(सदर लेखासाठी मुख्य स्त्रोत – 'साम्ययोग–साधना' ऑक्टोबर 2004; आणि 'अर्थबोधपत्रिका' ऑक्टोबर 2007)

राहुल बैस, मु.पो. अंजनगावबारी, व्हाया बडनेरा, ता.जि. अमरावती. पिन–444701
दूरभाष क्र. 9423102983, ईमेल – rahulbais@gmail.com